# 'वातावरण बदल व शेती'वर होणार मंथन

## औरंगाबादमध्ये १४ पासून आंतरराष्ट्रीय परिसंवाद, अनेक देशांचा सहभाग

**सकाळ वृत्तसेवा**

परभणी, ता. ५ : येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातर्फे ता. १४ ते १६ डिसेंबरदरम्यान औरंगाबादमधील महात्मा गांधी मिशनच्या (एमजीएम) रुक्मिणी सभागृहात 'जागतिक वातावरण बदल : शेती व जलक्षेत्रावर होणारे परिणाम' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिसंवाद होणार आहे. त्यात विविध देशांतील सहाशे शास्त्रज्ञ सहभागी होणार आहेत.

CCAW 2017

जगभरातील वातावरण बदल, शेतीवरील परिणाम, आपत्ती व्यवस्थापन, पावसातील खंड, वातावरणातील घटना, हवामान बदलानुसार शेती, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर अल्पभूधारक शेतकऱ्यांचे सक्षमीकरण, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट आदी उपाययोजनांवर परिसंवादत चर्चा होणार आहे. नवी दिल्ली येथील भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे माजी महासंचालक, पद्मभूषण डॉ. आर. एस. परोडा हे परिसंवाद सल्लागार समितीचे अध्यक्ष आहेत.

कुलगुरू डॉ. बी. व्यंकटेश्वरलू आयोजन समितीचे अध्यक्ष, तर राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. पी. विश्वनाथा, दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तपस भट्टाचार्य, अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास भाले, औरंगाबाद येथील 'वाल्मी'चे महासंचालक एच. के. गोसावी सहअध्यक्ष आहेत.

परिसंवादात अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, इजिप्त, श्रीलंका, व्हिएतनाम, बांगलादेश, नेपाळ आदी देशांतील सहाशे शास्त्रज्ञ सहभाग घेणार आहेत. आजपर्यंत देश-विदेशांतून सुमारे आठशेहून अधिक संशोधनपर निबंध प्राप्त झाले आहेत.

चौदा डिसेंबरला सकाळी दहाला होणाऱ्या परिसंवादाच्या उद्घाटनाला डॉ. परोडा, निती आयोगाचे डॉ. रमेश चंद, चारही कृषी विद्यापीठांचे कुलगुरू, 'वाल्मी'चे महासंचालक गोसावी, 'महिको'चे अध्यक्ष राजू बारवाले उपस्थित राहणार आहेत.